# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/07/2022 (शनिवार)

---

## खून

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील वार्ड नं. ०४ झोपडपट्टी सिल्लेवाडा येथे दिनांक २८/०६/२०२२ चे ०७/०० वा ते ०२/०७/२०२२ चे १०/३१ वा पर्यत आरोपी क्र. १) ब्रिजमोहन बनवारीलाल शाक्य वय ५६ वर्ष, २) सौ दमयंती ब्रिजमोहन शाक्य वय ५० वर्ष व वय १७ वर्षीय विधीसंघर्ष बालक तिन्ही रा. वार्ड नं. ०४ झोपडपट्टी सिल्लेवाडा यांनी संगनमत करुन घरघुती जुने वादावरुन झगडा करुन हातबुक्कीने व लाथीने मारपीट करुन फिर्यादीचे पती नामे— जगमोहन बनवारीलाल शाक्य(मृतक), वय ५० वर्ष रा. वार्ड नं. ०४ झोपडपट्टी सिल्लेवाडा यास जखमी केले. तसेच आरोपीतांनी फिर्यादीला सुद्धा मारहाण केली. फिर्यादीने आपल्या पतीला प्रथम उपचारकामी खापरखेडा सरकारी दवाखाना मध्ये दि. २८/०६/२०२२ रोजी नेले असता तेथील डॉक्टरांनी पुढील उपचाराकामी मेयो हॉस्पीटल नागपुर येथे रेफर केल्याने मृतकास मेयो हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता उपचारादरम्यान आज दि. ०२/०७/२०२२ चे ०१/३० वा. दरम्यान त्यास तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सुनिता जगमोहन शाक्य वय ४० वर्ष, रा. वार्ड नं ०४ झोपडपट्टी सिल्लेवाडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, ३२३, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी क्र १ व विधीसंघर्ष बालक यांना ताब्यात घेण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पिसे मो क्रं ९८८१३७७३४८ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील खापा टी पॉइट येथे दिनांक २८/०६/२०२२ चे १५.३० ते १६.०० वा. सुमारास मोटारसायकल क्र. एमएच—४०/एझेड—८०४० चा चालक आरोपी नामे— राकेश मिनष वलैय्या(मृतक), वय ४१ वर्ष, रा. नागपूर शिवाजी नगर हा खापा वरून जात असता त्याची मोटरसायकल ही खापा टी पॉईट येथे स्लीप होवून तो पडल्याने त्याच्या डोक्याला व छातीला मार लागला. त्यास उपचाराकामी प्रथम खापा रूग्णालय व नंतर टामा केअर सेंटर येथे भरती केले असता दि. ३०/०६/२२ चे ०१.०० वा. दरम्यान डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी पोहवा विकास बेलसरे मेडीकल पोलीस बूथ यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री केलगुलवार मो.न. ९१७५५७९१४३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**